द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.)

CBCS - अभ्यासक्रम - 2020 - 2021

Semester-III / सत्र - तिसरे

विषय - आर्थिक भूगोल — I

जनरल पेपर 2(G2) (G9 - 210 (A))

| Sr. No | Topic | Sub Topic |
|---|---|---|
| 1) | आर्थिक भूगोल - प्रस्तावना<br>Introduction of Economic Geography | 1.1 आर्थिक भूगोल - व्याख्या, स्वरूप, व्याप्ती.<br>1.2 - अभ्यासपद्धती<br>1.3 - गरज आणि फायदे<br>1.4 - आर्थिक भूगोल व सामाजिक शास्त्र सहसंबंध |
| 2) | आर्थिक क्रिया<br>Economic Activity. | 2.1 - आर्थिक क्रिया - प्रस्तावना, संकल्पना<br>2.2 - प्राथमिक व्यावसाय<br>2.3 द्वितीयक व्यावसाय<br>2.4 तृतियक व्यावसाय. |
| 3) | साधन संपदा - संकल्पना वर्गीकरण<br>concept & classification | 3.1 - साधन संपदा - संकल्पना<br>3.2 - पुनर्निक्रिय साधनसंपदा) जल विद्युत, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा<br>3.3 - अपुनर्निक्रिय साधनसंपदा) दगडी कोळसा, अशुद्ध तेल, खनिज तेल.<br>3.4 - साधनसंपदा संवर्धन |

09

| Sr. No | Topic | Sub-Topic |
|---|---|---|
| 4) | शेती<br>Agriculture | 4.1 - भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची भूमिका<br>4.2. भारतीय शेतीवर परिणाम करणारे घटक<br>अ) प्राकृतिक ब) सामाजिक-आर्थिक<br>क) राजकीय आणि सांस्कृतिक<br>4.3 भारतातील कृषी आधारित उद्योगधंदे<br>अ) कापड उद्योग<br>ब) साखर उद्योग<br>4.4 - कृषी पर्यटन |

| December 2010 | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 |
| | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

टॉपिक - 1

3 MON

आर्थिक भूगोल - व्याख्या, स्वरूप, व्याप्ती,

प्रस्तावना :-

भूगोलशास्त्रमाच्या प्राकृतिक भूगोल व मानवी भूगोल या दोन प्रमुख शाखा असून, मानवी भूगोल या प्रमुख शाखेची आर्थिक भूगोल एक महत्त्वपूर्ण उपशाखा आहे. आर्थिक भूगोलाचा अभ्यास प्राचीन भूगोलतज्ञांनी अप्रत्यक्षपणे केला होता. मात्र आधुनिकच्या काळात याविषयाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाला सुरवात झाली. चिशाम या भूगोल तज्ञास आर्थिक भूगोलाचा जनक असे म्हणतात. त्यांनी आर्थिक भूगोलास भू-अर्थशास्त्र (Geonomics) असे संबोधन दिले होते.

4 TUE

मानव आपल्या बहुतांश गरजा सभोतालच्या पर्यावरणातून भागवत असतो. अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण या मुलभूत गरजांची पुर्तता करण्यासाठी मानवाची अव्याहत धडपड चालू असते. त्यासाठी मानवाकडून विविध तंत्र, कौशल्य आणि साधनांचा वापर केला जातो. गरजा बरोबरच काही इच्छा, अपेक्षा असतात. त्या इच्छा अपेक्षांच्या पुर्तिची ओढ माणसाला सातत्याने कार्यरत ठेवते. त्यासाठी मानवाला प्रदेशा - प्रदेशामध्ये देवाण-घेवाण करून गतिमानता वाढवावी लागते. म्हणून नैसर्गिक साधनसंपदा, त्यांची भौगोलिक पार्श्वभूमी, मानवी क्रिया किंवा धडपड प्रयत्न यांचा विस्तृत अभ्यास आर्थिक भूगोलात अभिप्रेत आहे.

Notes

~~5 WED~~ थोडक्यात आर्थिक भूगोलात अर्थोत्पादनासाठी मानव जो व्यवहार करतो त्यांचा अभ्यास केला जातो. मानवाच्या आर्थिक हालचाली, वस्तूंचे उत्पादन, विनियोग उपभोग हे आर्थिक भूगोलाचे क्षेत्र आहे. आर्थिक भूगोलात मानव व त्याचे पर्यावरण यांचे आर्थिक नाते प्रस्थापित केले जाते.

आर्थिक भूगोलाच्या व्याख्या-

आर्थिक भूगोल हा शब्द सर्वात प्रथम 1882 मध्ये गॉट्झ या जर्मन तज्ञाने प्रचलित केला. आर्थिक भूगोलात मानवाचे आर्थिक व्यवहार, वस्तूंचे उत्पादन, त्यांची देवाण-घेवाण, उपभोग आणि क्षेत्रीय सहसंबंध अभ्यासले जातात. यावरून आर्थिक भूगोलाच्या व्याख्या पुढील प्रमाणे केल्या जातात.

~~6 THU~~ 1) जे. डब्ल्यू. अलेक्झांडर -:

आर्थिक भूगोल म्हणजे "पृथ्वीच्या पृष्ठभागावरील वस्तू व सेवा यांचे उत्पादन, विनियोग व उपभोग यांच्यातील आणि क्षेत्रीय विविधतेचा अभ्यास होय."

2) ईस्ट व थॉमस कॉनक्लींग-

"एखाद्या प्रदेशातील वस्तू व सेवा यांचे उत्पादन, विनियोग, उपभोग यांच्यातील क्षेत्रीय भिन्नता आणि त्या प्रदेशातील आर्थिक हालचालींचा कार्यात्मक सहसंबंध यांची चौकशी म्हणजे आर्थिक भूगोल होय"

Notes

3) आर्थिक भूगोल म्हणजे अर्थ आणि व्यापार यांच्याशी संबंधित असा, भौगोलिक घटकांचा बौद्धिकदृष्ट्या केलेला तर्कशुद्ध अभ्यास होय.
— चिशोम.



| December 2010 | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 |
| | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

4) हडसन स्टॅम्प :-



"मानवाच्या उत्पादन क्षमतेवर प्रभाव पाडणाऱ्या भौगोलिक व अन्य घटकांचा अभ्यास म्हणजे आर्थिक भूगोल होय.

5) झिम्मरमन :-

"आर्थिक भूगोल म्हणजे पर्यावरणाच्या संबंधातील मानवाच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र होय."

वरील व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, विविध प्रदेशातील आर्थिक क्रिया व त्या आर्थिक क्रिया त्याच प्रदेशात का स्थापन झाल्या यावर भर दिला जातो. याचे कारण



आर्थिक क्रिया कधीही एकाकी असू शकत नाहीत तर त्यांचा भौगोलिक परिस्थितीशी कार्यात्मक सहसंबंध असतो.

Notes